92.7 big fm
suno sunao, life banao!

# 92.7 बिग एफएमतर्फे चित्रपट 'रंगीला राजा'च्या रीलीजपूर्वी अभिनेते गोविंदा व मिशिका चौरासियासोबत निर्माता पहलाज निहालनीचे स्वागत

९० च्या दशकात बॉक्स ऑफिसवर अधिपत्य गाजवलेला अभिनेता गोविंदा पुन्हा एकदा त्याचा आगामी चित्रपट 'रंगीला राजा'सह चित्रपटसृष्टीमध्ये धमाका करण्यास सज्ज आहे. दिग्गज स्टार कलाकाराने नुकतेच चित्रपटाच्या प्रमोशनसाठी मुंबईमधील 92.7 बिग एफएम स्टुडिओला भेट दिली. यावेळी त्याच्यासोबत निर्माता आणि सीबीएफसीचे माजी प्रमुख पहलाज निहालनी आणि या सिनेमातून पदार्पण करत असलेली सुंदर अभिनेत्री मिशिका चौरासिया देखील उपस्थित होते.

चित्रपटाला 'रंगीला राजा' नाव असल्यामुळे प्रतिभासंपन्न गोविंदाखेरीज दुसरा कोणताच अभिनेता या चित्रपटातील मुख्य नायकाची भूमिका साकारू शकला नसता. या अभिनेत्याने बिग एमजे अनिरूद्धसोबतच्या चर्चेदरम्यान दीर्घकाळानंतर मोठ्या पडद्यावर परततानाचे आपले अनुभव शेअर केले. श्री. पहलाज निहालनी यांच्यासोबत आपल्या करिअरची सुरूवात केलेल्या गोविंदाने त्यांच्याप्रती आपले प्रेम व आदर व्यक्त केले. तसेच गोविंदाने करिअरला आकार देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी या निर्मात्याचे आभार देखील मानले. निर्माता पहलाज यांनी देखील उत्साही अभिनेत्यासाठी असलेले त्यांचे प्रेम व्यक्त केले. त्यांच्या मते गोविंदा चित्रपटामधील सर्वोत्तम अभिनयासाठी पुरस्कार प्राप्त करण्यास पात्र आहे.

चित्रपटाबाबत बोलताना गोविंदा म्हणाला, "हा अगदी गोविंदाचा चित्रपट आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर तुम्ही चित्रपटगृहातून हसत बाहेर येता. चित्रपटामध्ये काम करताना मला खरेच वाटले की लोक हा चित्रपट पाहतील तेव्हा ते चित्रपट कधीच विसरणार नाही. हा चित्रपट अनेक पद्धतींनी त्यांच्या समजामध्ये बदल घडवून आणेल. पहलाज निहालनी यांनी मला माझ्या करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर मदत केली आहे. पुन्हा एकदा अनेक वर्षांनी त्यांच्या चित्रपटाचा भाग असण्याचा मला खूप आनंद होत आहे. मी चित्रपटगृहामध्ये चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी खूपच उत्सुक आहे. मी आशा करतो की प्रेक्षकांना चित्रपट आवडेल आणि चित्रपटामधील माझा अभिनय देखील आवडेल."

'रंगीला राजा' चित्रपटामध्ये गोविंदा दुहेरी भूमिकेत दिसणार आहे आणि या भूमिकांना ९०च्या दशकातील फिल देण्यात आला आहे. या चित्रपटामध्ये शक्ती कपूर, दिगंगना सुर्यवंशी, मिशिका चौरासिया व अनुपमा अग्निहोत्री हे कलाकार देखील आहेत.

XXX